प्रशिक्षण - २५०३.१९७१ (५)

पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ०७

क्रमांकः विस्तार / २५०१-२६६५ /२०१५, पसं १३, पुणे-७, दिनांक : / ०५ / २०१५ २४.६.१५

विषयः- सन २०१५ -१६ विशेष घटक योजने अंतर्गत (अनुसूचित जाती/नवबौध्द लाभार्थींना) पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण देणे.
मार्गदर्शक सुचना २०१५ -१६.

संदर्भः- १. महाराष्ट्र शासन नियोजन विभाग परिपत्रक क्रमांक- जिवायो-१००९/ प्र.क्र.-१९३ /का-१४८१ मंत्रालय, मुबई -३२, दि.३/१२/२००९.
२. शासन परिपत्रक क्र. जिवायो-१००९/प्र.क्र.२१३/का-१४८१, मंत्रालय,मुंबई ३२ दिनांक ३० डिसेंबर २००९.

## लाभार्थींची निवड

१. योजनेत लाभार्थि निवड करण्याकरीता पारदर्शक पध्दती असावी.
२. अंमलबजावणी यंत्रणांनी वैयक्तिक लाभार्थींची निवड करताना प्रसिध्दी देऊन अर्ज मागवावेत व विहीत वेळेत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी.
३. लाभार्थींचे निवड करण्याचे अधिकार ज्या समितीस दिले आहेत,त्यासमितीमधील सदस्य विविध प्रशासकीय विभागातील असावेत व त्यापैकी किमान ५० टक्के सदस्य हे प्रशासकीय विभागाबाहेरील असावेत. यापैकी एक सभासद राज्यशासनातील वित्तीय पदांवर काम करणारा असावा.
४. निधी वितरणापूर्वी अमंलबजावणी यंत्रणेमार्फत निवडण्यात आलेल्या लाभार्थ्यांची यादी उपलब्ध करण्यात आलेली असावी. जेथे निधी वितरणापूर्वी लाभार्थ्यांची यादी मिळवणे शक्य नसेल,अशा वेळी कार्यान्वयीन यंत्रणांनी मागील वेळी वितरीत केलेल्या निधीतून निवडलेल्या लाभार्थ्यांची यादी जिल्हाधिका-यांना सादर करावी. लाभार्थ्यांची निवड योग्यरित्या करण्यात आलेली आहे याची जिल्हाधिका-यांना खात्री करुन द्यावी व त्यानूसार निधीचे वितरण करावे.
५. कार्यान्वयीन यंत्रणांनी योजनेमध्ये निवडलेल्या लाभार्थ्यांची यादी माहिती फलकावर व विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी तसेच सदरची यादी MPSIMS या प्रणालीवरही नोंदविण्यात यावी.
६. विभागीय आयुक्तालयातील उपायुक्त (नियोजन) / जिल्हा नियोजन अधिकारी तसेच इतर अधिकारी जेव्हा क्षेत्रीय भेटी देतात तेंव्हा त्यांनी यादीतील लाभार्थ्यांची माहिती तपासावी.
७. लाभार्थी निवडताना एकुण लाभार्थ्यांच्या ३० टक्के महिला लाभार्थी निवडीस प्राधान्य देण्यात यावे.
८. लाभार्थी निवडताना ३ टक्के लाभार्थी विकलांग प्रवर्गातील असावेत.
९. लाभार्थी निवडताना संबंधीत ग्रामपंचायतीची शिफारस प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

## योजनेचे स्वरूप

१. प्रशिक्षण वर्ग कालावधी ३ दिवसाचा राहील.

२. रु.१०००/-प्रती लाभार्थी खर्चाच्या मर्यादेत सन २०१५-१६ च्या उपलब्ध निधीतून प्रशिक्षणार्थीची संख्या ठरविणेत यावी.

३. प्रशिक्षण जनावरांच्या प्रक्षेत्रावरच घेण्यात यावे. यासाठी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, शेळी मेंढी विकास महामंडळ, भारतीय कृषि औद्योगीक प्रतिष्ठान, कृषि व पशुवैद्यकीय महाविद्यालय यांची मदत घ्यावी.

४. प्रक्षेत्रावर प्रशिक्षण घेणे शक्य नसल्यास इतर ठिकाणी सोईनूसार प्रशिक्षण घेण्यात यावे.

५. लाभार्थ्यांची रहाण्याची व जेवण्याची व्यवस्था प्रक्षेत्रावर/नियोजीत ठिकाणी करावी.

६. लाभार्थ्यांना सकाळच्या सत्रात प्रत्यक्ष तांत्रिक कामाबाबत प्रक्षेत्रावरच प्रात्यक्षिक देण्यात यावे व प्रशिक्षणार्थी समजूनच त्यांचेकडून काम करुन घ्यावे. संपुर्ण काम त्यांचेवर सोपवू नये. दुपारच्या सत्रात, प्रक्षेत्रावरील गायी म्हशीचे व्यवस्थापन यामध्ये मुख्यत: संकरीत पैदाशीचे, तंत्रज्ञान, ऋतूचक्र, माज ओळखणे, कृत्रिम रेतन, गाभण गाई/ म्हशीची निगा, जन्मलेल्या वासरांचे संगोपन, खाद्य- वैरणीचे प्रकार व उत्पादन तंत्रज्ञान, दुग्धस्पर्धा स्वच्छ दुग्धोत्पादन,जनावरांना होणारे रोग व त्यानुसार रोगप्रतिबंधक लसीकरण, औषधोपचार,सहकारी संस्थेचे सभासदत्व इ. बाबतची माहिती द्यावी.

७. शेळयामध्ये संकरीत पैदास, जन्मलेल्या करडाची जोपासना, नर विक्री बाबत बाजार व्यवस्था व शेळीपालन प्रकल्प अर्थशास्त्र याबाबतची माहिती द्यावी.

८. सकाळी ५ ते ८ आणि संध्याकाळी ४ नंतर प्रात्यक्षिक आयोजित करून लाभार्थ्यांना प्रत्यक्ष सहभागी करुन घ्यावे.

९. उर्वरीत वेळेत दृकश्राव्य माध्यम, मॉडेल्स, चार्टद्वारे प्रशिक्षण वर्गामध्ये तांत्रिक मार्गदर्शक करावे.

१०. प्रगतिशील शेतक-यांकडे सहल/बचत गटांना भेटी देऊन, त्यानुसार त्यांचेकडील जनावरांच्या जोपासनेबाबत प्रात्यक्षिक दाखवावे. जवळच असलेली प्रक्षेत्रे दुधमहासंघ, शेळया मेंढयाचे प्रक्षेत्रे यांना भेटी देण्यात याव्यात.

११. ट्रेनिंग एड मटेरीयल अंतर्गत प्रसिध्दी फलक तयार करुन घ्यावेत. प्रसिध्दीसाठी पत्रके/बॅनर्स, दृकश्राव्य व्यवस्था तांत्रिक कॅसेटस प्रशिक्षणाच्या संदर्भात उपलब्ध करुन घेऊन लाभार्थिना मार्गदर्शन करावे.

१२. एका लाभार्थीवरील रु.१,०००/- मर्यादेपर्यंतचा खर्च खालीलप्रमाणे दर्शविलेल्या तपशिलानूसार असावा.

| अ. क्र. | बाब | अंदाजे मर्यादा रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १ | लाभार्थींना चहा, नाष्टा जेवण | ३०० (रु.१००/- प्रतिदिवस) |
| २ | जाण्या येण्याचा खर्च (एसटी / रेल्वे तिकीट पाहुन) | १००/- |
| ३ | पेन, नोंदवही, छापील तांत्रिक माहिती | १००/- |
| ४ | दृकश्राव्य व्यवस्था प्रचार, बॅनर्स, चार्टस (ट्रेनिंग एड मटेरीयल अंतर्गत) प्रशिक्षणार्थी बेठक व्यवस्था हॉल इ. अनुषंगीक खर्च. | ५००/- |
| | एकुण | १०००/- |

**योजनेचे अंमलबजावणी अधिकारी**

१. योजनेची अंमलबजावणी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद हे असतील.
२. पात्र लाभार्थीकडुन विहित नमुन्यामध्ये अर्ज घेऊन पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे सादर करावेत व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सदरचे अर्ज शिफारशीसह जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचेकडे पाठवुन त्यांची तांत्रिक मंजुरी घ्यावी.
३. सन २०१५-१६ मध्ये वितरीत निधी चे उपयोगिता प्रमाणपत्र पुढील आर्थिक वर्षाच्या एप्रिल महिन्यात प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांचे मार्फत सादर करणे बंधनकारक राहिल.

**योजनेचे संनियंत्रण व मुल्यमापन**

१. योजनेचे सनियंत्रण जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालयामार्फत करणेत येईल. योजनेचे मुल्यमापन, अमंलबजावणी, परिणामकारकता आर्थिक, भौतिक साध्य, इत्यादी बाबतचा अहवाल पुढील वर्षाच्या एप्रिल महिन्यात आयुक्त कार्यालयास प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांनी सादर करावा.
२. वरील अहवालावर अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन (रोग नियंत्रण व पशुधन विकास) यांचे अभिप्राय घेऊन वार्षिक प्रशासन अहवालामध्ये समावेश करुन घेण्याची जबाबदारी सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) यांची राहील.

**आयुक्त पशुसंवर्धन,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे ०७**

**प्रत:-** माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी

१. मा. सचिव, महाराष्ट्र शासन, कृषि पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
(२ ते ८) मा. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, विभाग सर्व
(९ ते ३८ ) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सर्व
(३९ ते ७२) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
(७३) कार्यासन अधिकारी पसं ६ यांना माहितीसाठी